Scholarly Research Journal for Humanity Science & English Language
Online ISSN 2348-3083, SJ IMPACT FACTOR 2021: 7.27
https://www.srjis.com/issues_data/223
*PEER REVIEWED, REFEREED & INDEXED JOURNAL OCT-NOV 2023, Vol-11/60*

# विदर्भाचा सांस्कृतिक व सांगीतिक इतिहास

**प्रा. मीनाक्षी बसवंत**
*संगीत विभाग प्रमुख, एस. एन.डी.टी.कला व वाणिज्य महिला, महाविद्यालय पुणे.*
*Email.ID. minakshibaswant@gmail.com*

**Paper Received On:** 25 October 2023

**Peer Reviewed On:** 30 November 2023

**Published On:** 01 December 2023

## प्रस्तावना

विदर्भ हा प्राचीन सांस्कृतिक, ऐतिहासिक, आणि सामाजिक दृष्टिकोनातून महत्त्वपूर्ण प्रदेश आहे. या प्रदेशाचा उल्लेख प्राचीन ग्रंथांमध्ये, विशेषतः रामायण आणि महाभारत काळापासून आढळतो. या भूमीत नाग आणि मुंड अनार्यांची वस्ती होती, ज्यांच्याशी आर्यांनी आपली संस्कृती प्रभावीपणे प्रसारित केली. विदर्भावर मौर्य, सातवाहन, वाकाटक, राष्ट्रकूट, चालुक्य, यादव आणि मराठा अशा विविध घराण्यांची सत्ता प्रस्थापित होती. सांस्कृतिकदृष्ट्या, विदर्भ हे संतांची आणि साहित्यिकांची भूमी म्हणून ओळखले जाते. याच परंपरेत संगीताने महत्त्वाचे स्थान प्राप्त केले. नागपूर हा विदर्भातील सांगीतिक परंपरेचा केंद्रबिंदू बनला. भोसले राजवटीपासून विदर्भात शास्त्रीय संगीताला राजाश्रय मिळत गेला. विविध राज्यातील कलाकार येथील दरबारात जलसे करीत असत. विदर्भातील शास्त्रीय संगीताची परंपरा पं. अनंतराव काशीकर यांच्यापासून सुरू झाली. या प्रदेशाने वसंतराव देशपांडे, डॉ. सुमती मुटाटकर, पं. प्रभाकरराव देशकर, मनोहरराव कासलीकर ,राजाभाऊ कोकजे ,राजाभाऊ नवसालकर अशे अनेक दिग्गज कलाकार संगीत क्षेत्राला दिले.विदर्भाचा सांस्कृतिक वारसा समृद्ध असून, त्यातील लोककला, लोकसंगीत, शास्त्रीय संगीत, आणि धार्मिक-सामाजिक परंपरांचा अभ्यास विदर्भाच्या सांस्कृतिक कलेचे उत्तम दर्शन घडवतो.

## विदर्भाचा इतिहास

भारताच्या दक्षिण भागाला विंध्यपूर्ण पर्वतापलीकडे विदर्भ हा प्रदेश आहे या प्रदेशावर विदर्भ नावाच्याच राजाचे राज्य होते तेथे नाग व मुंड या अनार्य लोकांची वस्ती होती.आर्यानीं उत्तर हिंदुस्तानात आपला जम बसविल्यानंतर मोठ्या प्रयत्नांनी त्यांनी या प्रदेशात प्रवेश मिळविल्यानंतर येथील अनार्यांशी शक्ती व युक्ती याद्वारे त्यांना आपलेसे केले आणि आपल्या संस्कृतीचा येथे प्रसार केला. प्राचीन इतिहास काळापासून ते स्वातंत्र्यपूर्व काळापर्यंत विदर्भावर

*Copyright@2023 Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*

विविध घराण्याची सत्ता प्रस्थापित होती मौर्य, सातवाहन, वाकाटक कलचुरी, राष्ट्रकूट, कल्याणीचे चालुक्य ,देवगिरीचे यादव ,मुस्लिम राजवटी , मराठा राज्य इत्यादी घराण्याची सत्ता विदर्भामध्ये होती शिलालेख ताम्रपट नाणी प्रतिमा वस्तू किल्ले इत्यादींच्या आधारावर कोणत्या घराण्याची सत्ता विदर्भात होती हे आपल्याला दिसून येते रामायण महाभारत या काळात सुद्धा विदर्भाचा उल्लेख आढळून येतो.

विदर्भाच्या साहित्याला मोठी परंपरा आहे कालिदासासारखे विद्वान कवी विदर्भात निर्माण झाले त्यांच्या काव्यामधून विदर्भाच्या प्राचीनतेचे स्वरूप दिसून येते. विदर्भ या नावासंदर्भात दोन कथा प्रसिद्ध आहेत एक यदुवंश यांची भोज नावाच्या शाखेचे या प्रदेशांमध्ये शासन होते. म्हणजेच या शाखेमध्ये विदर्भ भोज नावाचा राजा या राजाच्या नावावरून या प्रदेशाचे नाव विदर्भ पडले आणि दुसरी कथा अशी आहे. की ऋग्वेद याचे नऊ मुलांपैकी एकाच नाव विदर्भ होते वडिलांच्या आज्ञे वरून त्याने या प्रदेशाचे शासन सांभाळले त्याच्या नावावरूनच या प्रदेशाला विदर्भ असे नाव पडले.

**सांगीतिक इतिहास**

महाराष्ट्राची उपराजधानी असलेले आणि विदर्भाची राजधानी म्हणून भारताच्या नकाशामध्ये मध्यभागी असणाऱ्या नागपूरचा इतिहास बघीतला तर पूर्वीपासूनच विदर्भामध्ये नागपूर शहराला अतिशय महत्व आहे.संगीताची परंपरा पूर्वीपासूनच विदर्भाला लाभली आहे. विविध राज्यातील कलाकारांचे त्या त्या काळातील महत्वपूर्ण सांगीतिक योगदान संगीत क्षेत्राला लाभले आहे. विदर्भ हे संतांची व साहित्याची भूमी म्हणून ओळखली जाते या मातीत अनेक संत महंतांनी वेळोवेळी समाज प्रबोधन करत समाजाला जागृत करण्याचे कार्य केले आहे.वैदर्भीय सांस्कृतिक परंपरेचा विकास पहिल्या रघुजी भोसले यांच्या काळात झाला.पहिल्या रघुजी भोसले पासून तर तिसऱ्या रघुजी भोसले पर्यंत कलाकारांना राजाश्रय मिळत होता .त्यांच्या दरबारामध्ये जलसे करण्यासाठी दुरून दुरून गवई येत असत .आणि उत्सव सुद्धा साजरे होत असत ,वाघोडा या गावी झालेल्या उत्सवाचे वर्णन एका मराठी कवीने आपल्या कवितेत केलेले दिसते "वाजे सारंगी सतार । लागे पखवाजाचा ताल । भले गवई गाणार । सूर ताल धरून । "१" या कवितेवरून लक्षात येते कि भोसले काळामध्ये शास्त्रीय संगीत गाण्याची विशेष आवड होती.

तिसरे रघुजी निसंतान असल्यामुळे त्यांच्यामृत्युनंतर इंग्रजांची राजवट सुरु झाली .भोसले राजवटीचा अंत झाला राजवैभव व्यवस्थित राहावे म्हणून जानोजीराव भोसले यांना उत्तराधिकारी नेमले गेले.जानोजी राव भोसले सर्वगुणसंपन्न होते त्यांना भजन,कीर्तन ,मैफिली ,उत्सव इत्यादीची आवड होती .जानोजीरावांच्या काळात कलाकारांना प्रोत्साहन मिळाले.नागपूरच्या भोसले दरबारामध्ये दिल्ली, बनारस,पुणे हैद्राबाद ग्वाल्हेर ,इंदूर येथील दरबारातून प्रसिद्ध गवई येत होते आणि त्यांचा सत्कार सुद्धा भोसल्यांच्या दरबारामध्ये होत असे .

भोसले दरबारामध्ये पं. अनंतराव काशीकर यांनी अभिजात संगीताची परंपरा सुरु केली. बाबाजी घुले शास्त्री यांनी शिष्यसंप्रदाय निर्माण केला." २" बाबाजी घुले यांचे शिष्य बाबूजी जोशी दुसरे जगन्नाथजी वैद्य तिसरे बाबूजी बेदरकर हे होते. "बाबाजी घुल्यांचा काळ म्हणजे रघुजी महाराजांचे वडील जानोजीराजे यांचा काळ होय. "१"

या कालावधीत नागपूर विदर्भात कलाकारांची संख्या बरीच झाली.गायनसंस्था ,वादनसंस्था,गणेश उत्सव ,इत्यादी परंपरा निर्माण झाल्या. कलाविकास होत गेला तसा नागपूर नगरीचा विकासही होत गेला गोंडराजांचे व भोसल्यांचे मूळ केंद्र हे महाल विभागात होते.तेव्हा नागपूरचा मुख्य भाग महाल समजला जात होता.नागपूर येथे सांगीतिक दृष्ट्या बऱ्याच योजना साकारल्या स्पर्धा,संगीत संस्था,नागपूर आकाशवाणीची नागपूरला स्थापना झाली शाळा महाविद्यालयांमध्ये संगीताचे शिक्षण मिळू लागले.नागपूर उपराजधानीचे शहर गणल्या जाऊ लागले.याशिवाय भारतीय अभिजात संगीतात ज्यांचे महत्त्वपूर्ण योगदान राहिले आहे . ते प्रभाकरराव खर्डेनवीस ,पंडित शंकरराव प्रवर्तक,श्री. अमृतराव निस्ताने पंडित मनोहरराव कासलीकर ,राजाभाऊ कोकजे गायनाचार्य,राजाभाऊ नवसालकर,पं .देविदासपंत काळेगुरुजी, वसंतराव देशपांडे,डॉ.सुमती मुटाटकर,अमृतराव निस्ताने , श्री.भैयासाहेब वझलकार,डॉ.चित्रा मोडक, श्रीधरराव ढगे ,राजाभाऊ देव ,श्रीमती विजया नाईक ,प्रभाकरराव धाकडे,,डॉ. नारायणराव मंगळूरकर, प्रा.डॉ. सुमनताई चौधरी ," डॉ.कमलताई भोंडे ,सौ.साधना शिलेदार यांनी विदर्भाच्या संगीताची परंपरा अखंड ठेवण्यासाठी संगीताचा गायन पक्ष व शास्त्र पक्ष सुदृढ केला हे विदर्भाच्या सांगीतिक दृष्टिकोनातून अतिशय उल्लेखनीय व महत्त्वपूर्ण कार्य आहे.

**विदर्भाचा सांस्कृतिक इतिहास :-**

विदर्भाच्या सांस्कृतिक परंपरेचा विकास पहिल्या रघुजी भोसले यांच्या काळात झाला.तेव्हा लढाया व्हायच्या परंतु त्याचा त्रास प्रजेला होत नसे.त्यामुळे दैनंदिन जीवनात त्याचा परिणाम झालेला दिसत नाही.त्यामुळे सांस्कृतिक जीवन समृद्ध आणि सुखकर होते.सांस्कृतिक आणि धार्मिक क्षेत्रात भोसले राजवटीवर साताऱ्याच्या छत्रपतींचे आणि पेशव्यांचे प्रतिबिंब दिसून येते कारण पेशव्यांच्या पुण्यासारख्याच त्यांनी "नागपूरात मुधोजीने तुळशीबाग,बेलबाग निर्माण केले"६"व पुण्याच्या पेठाप्रमाणेच त्यांनी नागपूरमध्ये आदितवार पेठ, शुक्रवारी ,बाळाबाई पेठ ,चिमाबाई पेठ निर्माण केल्या.मुधोजी भोसले हे दान दक्षिणा सधळ हाताने दयायचे.त्यामुळे त्यांच्या काळात धार्मिक भेदभाव नव्हता त्यांच्या या धार्मिकतेमुळे मुसलमान सुद्धा ठिकठिकाणी नागपूरमध्ये स्थायिक झाले.त्यांच्या कारकीर्दीमध्ये सर्व मुस्लीम गुण्यागोविंदाने राहत असत व त्यांना मशीद सुद्धा बांधून देण्यात आल्या. स्वताहा मुधोजी परिवारातील मंडळी मुस्लिमांच्या ईद,मोहरम या उत्सवांमध्ये सहभागी होत असत.मुस्लीम मंडळी सुद्धा हिंदुच्या दिवाळी,होळी ,रक्षाबंधन,वसंत पंचमी ,रामनवमी ,कृष्णाष्टमी ,गणेश उत्सव या सगळ्या सणांमध्ये सहभागी होत असत. राजघराण्यातील समारंभात सर्व प्रजा सामील होत असे तिथे हिंदू ,मुस्लीम हा भेदभाव नसे त्यामुळे आपला पालनकर्ता आपला पोशिंदा अशी भावना प्रजेमध्ये असायची.

**लोक परंपरा आणि धार्मिक उत्सव आणि सामाजिक उत्सव :-**

इतर राज्यांप्रमाणे या राज्यातही हिंदूंचे चार प्रमुख सण मोठ्या थाटामाटात साजरे केले जातात. याशिवाय शारदोत्सव, गोकुळा-ष्टमी, रामनवमी, हनुमान जयंती, पोळा (बैलांचा सण) इत्यादी विशेष आकर्षणे आहेत. इस्लाम, जैन, बौद्ध, ख्रिश्चन इत्यादी धर्मांचे सणही तितक्याच उत्साहाने साजरे केले जातात. यामध्ये ईद, मोहरम, ख्रिसमस, महावीर जयंती, बुद्ध जयंती इत्यादी प्रमुख आहेत. मोहरम इत्यादी सणांमध्येही हिंदू सहभागी होतात. ही

परंपरा सामाजिक आणि राष्ट्रीय एकात्मतेचे उत्तम उदाहरण आहे. अखिल भारतीय बौद्ध परिषद दरवर्षी नागपुरात आयोजित केली जाते, ज्यामध्ये देश-विदेशातील बौद्ध अनुयायी सहभागी होतात.

भाद्रपद महिन्यात हिंदू लोक गणेशोत्सव साजरा करतात. भोसले काळापासूनच चालवलेला हा उत्सव इथे खूप लोकप्रिय आहे. गणेशोत्सवाप्रमाणेच दुर्गादुजा उत्सवही खूप लोकप्रिय आहे. शारदोत्सव हा महिलांचा आवडता सण आहे. या निमित्ताने ते हळदी कुमकुम इत्यादी कार्यक्रम आयोजित करतात. या धार्मिक सणांव्यतिरिक्त, इतर अनेक सांस्कृतिक उत्सवही वेळोवेळी साजरे केले जातात, जे प्रादेशिक जीवनाची आनंददायी झलक देतात.अजूनही हे धार्मिक उत्सव विदर्भामध्ये मोठ्या प्रमाणात साजरे केल्या जातात.

**विदर्भातील राष्ट्रीत उत्सव :-**

ज्याप्रमाणे स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आपण 'स्वातंत्र्यदिन' आणि 'प्रजासत्ताक दिन' हे राष्ट्रीय सण म्हणून साजरे करतो, त्याचप्रमाणे स्वातंत्र्य चळवळीच्या काळात 'गणेशोत्सव' आणि 'शिवाजी उत्सव' हे राष्ट्रीय सण म्हणून साजरे केले जात होते. या सणांच्या माध्यमातून लोकांमध्ये राष्ट्रीयता भावना जागृत करण्याचे उल्लेखनीय कार्य केले. या सणांच्या माध्यमातून राष्ट्रीय चळवळीला गती देण्याचे उल्लेखनीय कार्य या राज्यात झाले. गणेशोत्सव हा राष्ट्रीय चळवळीचा एक भाग असल्याची ब्रिटीश सरकारला पूर्ण खात्री होती. तरीही, कीर्तनकार किंवा वक्ते विविध पौराणिक कथांद्वारे त्यांच्या कीर्तनांमध्ये किंवा भाषणांमध्ये प्राचीन आणि आधुनिक घटकांचे मिश्रण करून लोकांमध्ये त्यांच्या कर्तव्याबद्दल जागरूकता पसरवत असत. आजही गणेशोत्सव मोठ्या थाटामाटात साजरा केला जातो; पण त्याचे स्वरूप पूर्णपणे धार्मिक-सांस्कृतिक झाले आहे. त्यामुळेच या उत्सवाला राष्ट्रीय स्वरूप प्राप्त झाले. या उत्सवांमध्ये राजकीय प्रवचने, कीर्तन, पोवाडे यांची नवीन परंपरा सुरू झाली आणि अशा उत्सवांमध्ये राजकीय व्याख्याने, कीर्तन, गीते यांचा चांगला प्रसार झाला.

संपूर्ण महाराष्ट्राप्रमाणे या भागातही "शिवाजी उत्सव" हा राष्ट्रीय सण म्हणून साजरा केला जातो. विसाव्या शतकाच्या पहिल्या दशकात, हा उत्सव गणेशोत्सवाप्रमाणेच साजरा केला जातो

विदर्भातील लोककला आणि लोकसंगीत

विदर्भाच्या प्रत्येक जिल्ह्यात वेगवेगळे भाषा बोलल्या जातात आणि या प्रदेशांत भाषिक विविधता आढळून येते अमरावती, अकोला ,बुलढाणा ,वाशिम, यवतमाळ, या पाच जिल्ह्यांमध्ये वऱ्हाडी भाषा बोलल्या जाते नागपूर शहरांमध्ये मिश्र बोली बोलल्या जाते गोंदिया भंडारा चंद्रपूर गडचिरोली या चार जिल्ह्यांमध्ये झाडी बोली बोलली जाते या लोकभाषांसह विदर्भात कोरकू ,चित्तोडिया, गोरमाटी ,कोल्हाटी ,गोंडी, हलबी ,राठ्या ,कोलामी ,घिसाडी, गोल्ला ,कोहली ,निघाली, पोवारी ,आणि अशा कितीतरी भाषा बोलल्या जातात.या भाषा इतिहास संपन्न भाषा आहेत या भाषा समुदायामध्ये संगीत ,नृत्य ,चित्रकला समृद्ध आहेत. त्याचप्रमाणे लोकनाट्य मध्ये तमाशाला तितकेच महत्व आहे तमाशा हे सामान्य नर्तकाद्वारे डफ किंवा मृदंगम आणि एकतारे याव्द्वारे सादर करतात. नृत्याबरोबरच प्रहसनही योग्य वेळेच्या अंतराने सादर केले जाते, ज्याचा उद्देश प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेणे आणि त्यांचे मनोरंजन करणे हा आहे. गोंधळ आणि दंडार नावाचा नाट्यप्रकार देखील या राज्यात लोकप्रिय आहे. गोंधळ हे

गोंधळी नावाच्या एका विशिष्ट जातीद्वारे सादर केले जाते., पोवाडे, अभंग या रूपातील कवींची गाणी समाजात खूप लोकप्रिय आहेत. ही गाणी हिंदी आणि मराठी अशा दोन्ही भाषांमध्ये गायली जातात.

विदर्भामध्ये आदिवासींच्या लोकनृत्यांचे आणि लोकगीतांचे विशेष आकर्षण आहे. लग्न वगैरे प्रसंगी हे सोहळ्याचे आयोजन केले जाते. होळी हा त्यांच्यासाठी महत्त्वाचा सण आहे. त्या दिवशी ते आकर्षक नृत्य करताना दिसतात. संपूर्ण रात्र रेला नावाचे तालबद्ध नृत्य करण्यात घालवली जाते. "घोटूल" हे त्यांचे अतिशय प्रसिद्ध आणि लोकप्रिय नृत्य आहे. विदर्भात अनेक आदिम जाती प्रदीर्घ काळापासून राहत आहेत. येथील गोंड वस्तीची परंपरा फार जुनी आहे. जसे गोंड, खोंड, कोरकू, कोलाम, बैगा इ. विदर्भातील विविध आदिम जातींमध्ये गोंड जातीची लोकसंख्या सर्वात जास्त आहे.

शास्त्रीय संगीताची वाटचाल : शास्त्रीय संगीताची वाटचाल अभ्यासताना असे लक्षात येते की नागपूर शहरांमध्ये शास्त्रीय संगीताचा विकास जास्त प्रमाणात झालेला आहे इतर भागांमध्ये शास्त्रीय संगीताला फारशी गती लाभलेली नाही.

शास्त्रीय संगीताची पार्श्वभूमी –नागपूरच्या भोसले घराण्याची रसिकता बघून जलसे करण्यासाठी त्यांच्याकडे दुरून दुरून लोक यायची व भोसले दरबारामध्ये त्यांना राजाश्रय मिळायचा .

शास्रीय संगीताचा पाया घालणारे कलाकार - नागपूरमध्ये शास्त्रीय गाण्याची परंपरा बाबाजी घुले यांच्यापासून सुरु होते."१ " त्यांचे शिष्य बाबूजी जोशी हे होते नागपूरचेच बाळकृष्ण बुवा हे उत्तम गाणारे होते. त्यांचे धृपद धमार टप्पा ठुमरी गाण्यावर वर्चस्व होते .

**विदर्भातील अभिजात संगीत जपणारे कलाकार –**

नागपूर जिल्ह्यातील कलाकार – शंकरराव प्रवर्तक ,राजाभाऊ कोगजे ,पं प्रभाकरराव देशकर, ,स्व. पंडित संपतलाल ,पं. गोपाळराव वाडेगावकर ,स्व. नानाजी नासिरकर ,गोविंदराव भूताड (तबला ),पं. रमाकांत सोमनाथ देवपुजारी ,डॉ.बाळासाहेब पुरोहित, प्रभाकरराव धाकडे , प्रा.सौ.मोहना नार्डीकर ,डॉ चित्रा मोडक,डॉ .उषाताई पारखी,श्रीधरराव ढगे, डॉ.नारायणराव मंगरुळकर,श्री भैयासाहेब वझलवार,स्व.श्री.अमृतराव निस्ताने,पं. प्रभाकरराव खर्डेनवीस, श्री. शरद सुतवणे, संदेश पोपटकर ( तबला वादक ),श्रीकांतजी बाकरे,पं.मनोहरराव चिमोटे .(संवादिनी )

अमरावती जिल्ह्यातील कलाकार –पं मनोहरराव कासलीकर,पं.दिनकरराव उर्फ भैयासाहेब देशपांडे ,पं सदाशिवराव गुर्जर ,श्री कृष्णराव वर्हेकर,उस्तात लड्डूमिया खांसाहेब ,वामनराव गणपतराव धावंजेवार(बेला),प्रा. सुमनताई चौधरी,डॉ.कमलताई भोंडे , पं. मनोहरराव कवीश्वर, .देविदासपंत काळेगुरुजी, ,सौ.साधना शिलेदार, राजाभाऊ नवसाळकर,सौ.अलकनंदा तुळजापुरकर,श्री.वसंतराव श्रावणजी ठाणेकर (तबला),श्री. नरसिंगजी गोपंन्ना बोडे. डॉ.स्नेहाशीस दास.

**विदर्भातील इतर जिल्हातील कलाकार :-**

पं. परशुराम कांबळे. डॉ.व्ही व्ही. उर्फ बाबासाहेब देशपांडे,पं. स.भ. देशपांडे उर्फ बाबुराव वडगावकर.स्व. लक्ष्मण वामनराव पोफळकर ,स्व.डॉ.शकुंतला पळसोकार ,सुधाकर बळीराम प्रधान (हार्मोनियम वादक ) ,

स्व.शामरावजी विलायची,पंडित जयदेव पत्की,आकाश चांदुरकर (तबला वादक ), डॉ.श्याम गुंडावार डॉ.हरिभाउजी खंडारे

**निष्कर्ष :-**

विदर्भातील संगीताची परिस्थिती बघता खूपच प्रगती झालेली आहे. शालेय आणि महाविद्यालयीन स्तरावर संगीत शिक्षणाची वाढ होत आहे, ज्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये संगीताची आवड निर्माण होते. नागपूर विद्यापीठासारख्या प्रतिष्ठित विद्यापीठांमध्ये संगीत विषय शिकवला जातो, तसेच गंधर्व विद्यालय आणि इतर खाजगी संस्थांची संगीत शिक्षणात महत्त्वाची भूमिका आहे.विदर्भातील संगीताचा सामाजिक आणि सांस्कृतिक वारसा पुढे नेण्यासाठी अनेक सामाजिक संस्थांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे.

संगीताच्या स्पर्धा, महोत्सव आणि मैफिलींचे आयोजन मोठ्या प्रमाणावर केले जाते, ज्यामुळे विदर्भातील नवोदित कलाकारांना संधी मिळते. मीडिया, विशेषतः दूरदर्शन आणि खाजगी अल्बमच्या माध्यमातून विदर्भातील कलाकारांना राष्ट्रीय स्तरावर ओळख मिळत आहे. विदर्भामध्ये पारंपारिक संगीताचा वारसा अजूनही जपला जात आहे आणि नवीन पिढ्या याकडे आकर्षित होत आहेत.संपूर्णतः विदर्भात संगीताचे शिक्षण, प्रदर्शन, आणि संधी या सर्वच बाबतीत प्रगतिपथावर आहे.

**सन्दर्भ ग्रंथ सूची**

*कोलारकर डॉ. श.गो, आधुनिक विदर्भाचा इतिहास1885 ते 1947 श्री मंगेश प्रकाशन श्री शांता दुर्गा निवास तरुण भारत जवळ २३ नवी रामदास पेठ नागपूर आवृत्ती २०१६*

*मंगलरूळकर डॉ. नारायण , वैदर्भीय संगीतोपासक भाग १ विजया मंगलरूळकर प्रकाशन हनुमान रोड सीताबर्डी नागपूर१२ आवृत्ती १९७४*

*मंगलरूळकर डॉ. नारायण , वैदर्भीय संगीतोपासक भाग २ विजया मंगलरूळकर प्रकाशन हनुमान रोड सीताबर्डी नागपूर१२आवृत्ती १९७६*

*कोलारकर डॉ. श.गो, आधुनिक विदर्भाचा इतिहास1885 ते 1947 श्री मंगेश प्रकाशन श्री शांता दुर्गा निवास तरुण भारत जवळ २३ नवी रामदास पेठ नागपूर आवृत्ती २०१६*

*गुप्त डॉ. नथ्थुलाल, विदर्भ का सांस्कृतिक इतिहास प्रकाशक श्री आर बी सिंग विश्वभारती प्रकाशन धनवटे चेंबर सिताबर्डी नागपूर आवृत्ती १९४७*

*अंधारे डॉ.भा.रा., नागपूरचे भोसले १७३० ते २००२, प्रकाशन हिंदी मराठी प्रकाशन सीताबर्डी नागपूर आवृत्ती २०१८*

*गोंडाने डॉ.नरेश, वैदर्भीय सांगीतिक कलावंताचे संगीतक्षेत्रास योगदान दशकपूर्ती महोत्सवी वर्ष नभ प्रकाशक मिलिंद डहाके नभ प्रकाशन श्याम नगर कॉंग्रेस नगर रोड अमरावती प्रकाशन दिनांक ६ ऑक्टोबर २०१८*

*रानडे डॉ, अशोक, हिंदुस्तानी संगीत प्रथम प्रकाशन २००६ संचालक नॅशनल बुक ट्रस्ट इंडिया नेहरू भवन फाईव्ह इन्स्टिट्यूशनल एरिया फेस टू वसंत कुंज नवी दिल्ली.*

*डोळके डॉ. राजेंद्र, विदर्भातील संशोधनाचा इतिहास प्रकाशन प्रकाश विलास मानेकर सरचिटणीस विदर्भ साहित्य संघ नागपूर प्रथम आवृत्ती गुढीपाडवा २ एप्रिल २०२२*

*देशपांडे वामनराव, महाराष्ट्राचे संगीतातील कार्य प्रकाशन महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ आवृत्ती जून १९७४१*

**संदर्भ ग्रंथ**

*कुलकर्णी डॉ. शुभदा, महाराष्ट्रातील संगीत परंपरा प्रकाशन प्रकाश दत्तात्रेय गं पाष्टे डायमंड पब्लिकेशन १९९१ सदाशिव पेठ शंकर प्रसाद को हाउसिंग सोसायटी तिसरा मजला टिळक रोड पुणे डायमंड पब्लिकेशन पुणे प्रथम आवृत्ती १जानेवारी २०१०*

*मांडे प्रभाकर,लोक गायकांची परंपरा प्रकाशक प्राध्यापक सौ वृषाली अविनाश मांडे गोदावरी प्रकाशन मंगल प्रभा सिडको औरंगाबाद आवृत्ती १२ एप्रिल २०११*

*मालकर अंजली मराठवाड्यातील अभिजात संगीत १५ मे २००५ आवृत्ती*

*देशपांडे सत्यशील, गाणं गुणगान एक सांगितिक यात्रा प्रकाशक दिलीप माजगावकर राजहंस प्रकाशन प्राणी सदाशिव पेठ पुणे आवृत्ती पहिली नोव्हेंबर२०२२ आवृत्ती दुसरी फेब्रुवारी २०२३*

*ठाकूर डॉ. शालिनी, रागदारी संगीत और फ्युजन संगीत एक प्रयोग धर्मिता राधा पब्लिकेशन्स नई दिल्ली पहिला संस्करण २०१५*

*सर्वडीकर डॉक्टर अतिंद्र, किराणा घराणे परंपरा आणि प्रवाह एका उत्तुंग संगीत परंपरेचा संशोधनात्मक अभ्यास प्रकाशक वितरण प्रसाद कुलकर्णी संस्कार प्रकाशन अभ्युदय नगर काळाचौकी मुंबई प्रथम आवृत्ती १४ मे २०१७*

*शुक्ला डॉ. मधुरानी,लोकभाषा एवं संगीत, प्रकाशन कनिष्क पब्लिशिंग हाऊस अन्सारी रोड नई दिल्ली संस्करण २०१८*

*श्रीवास्तव विना, भारतीय लोकसंगीत संरक्षण संवर्धन एवं संभावन संपादक राधा पब्लिकेशन अन्सारी रोड दर्या गाणी नई दिल्ली प्रथम संस्करण २०१२*

*मालवीय डॉ.श्रद्धा, भारतीय संगीत तज्ञ एवं संगीत ग्रंथ प्रकाशन कनिष्क पब्लिशर्स*

*डॉक्टर संजय,रागदारी संगीत की विभिन्न बंदीशोका सौंदर्यात्म विश्लेषण प्रकाशन नई दिल्ली प्रथम संस्करण २०१८*

*ठाकूर डॉ. जयदेव, सिंग भारतीय संगीत का इतिहास विश्वावियालय प्रकाशन चौक वाराणसी द्वितीय संस्करण २०१०*

*वर्मा डॉ. सिमी, प्राचीन एवं मध्यकाल के शास्त्र कारो का संगीत मे योगदान*

*कनिष्क पब्लिशर्स डिस्ट्रीब्यूटर्सरी रोड दर्या गंज नई दिल्ली.*

*प्रथम संस्करण २०१२*

*दिलचस्प , हिंदी सिनेमा के १००साल , भारतीय पुस्तक परिषद् दिल्ली*

*डॉ.विमल,हिंदी चित्रपट एवं संगीत का विकास सोमनाथ ढल प्रकाशन न्यू दिल्ली*

*मुजावर इसाक,चित्रपट संगीताचा सुवर्ण काळ १९३१ ते १९६० तीन प्रतिक प्रकाशन पुणे.*

*गर्ग डॉ.उमा , संगीत का सौंदर्य बोध पृष्ठ संख्या ६ संजय प्रकाशन दिल्ली*

*मुजावर इसाक चित्रपट संगीताचा सुवर्णकाळ १९*